वर्ष-०८ | अंक-४१ | मुंबई, मंगळवार ३० ऑगस्ट ते ०५ सप्टेंबर - २०२२ | पृष्ठ-४

ठाणे आवृत्ती

मराठी साप्ताहिक

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

POSTAL REGISTRATION No.PLG/205/2022-2024

मूल्य २/- रुपये

# पोलीस बातमी पत्र

पोलीस बातमी पत्र

• संपादक : दिपक मोरेश्वर नाईक

PG 2
शरद पवारांचे मोदी सरकारवर टीकास्त्र:'अच्छे दिन' आले नाहीत, भाजपने 2014 ला दिलेली आश्वासनं पूर्ण केली नाहीत

3 → गणेशोत्सव 'न्यू नॉर्मल' करता येईल?

सावधान: वीजबिलांआडून सायबर फसवणूक ; बनावट मेसेज पाठवून ग्राहकांची होत आहे फसवणूक. ← 4

www.policebatmipatra.com / policebatmipatra.in policebatmipatra@gmail.com FOLLOW US! https://policebatmipatra.page

## पोलिसांची दुचाकी चोरांविरोधात मोठी कारवाई; गुन्ह्यातील 6 मोटारसायकल जप्त

पोलिसांकडून एकुण 1 लाख 20 हजार रुपये किंमतीच्या मोटरसायकल जप्त करण्यात आल्या आहे.



औरंगाबाद शहर पोलिसांच्या सिटी चौक पोलिसांनी दुचाकी चोरांविरोधात मोठी कारवाई केली आहे. पोलिसांनी यावेळी चोरीच्या एकूण 6 मोटारसायकल चोरट्यांच्या ताब्यातून जप्त केल्या असून, दुचाकी चोरणाऱ्या दोघांना बेड्या ठोकल्या आहेत. सोहेल अफरोज पटेल (वय 22 वर्ष रा. इंदिरानगर बायजीपुरा औरंगाबाद), शेख वाजेद शेख आरेफ (वय 24 वर्ष रा. गुलशननगर ता. सिल्लोड, औरंगाबाद) असे दुचाकी चोरणाऱ्या आरोपींचे नावं आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, एका मोपेड चोरीचा तपास करत असतांना सोहेल पटेल आणि वाजेद शेख यांनी ती चोरली असल्याची माहिती गुप्त बातमीदारामार्फत पोलिसांना मिळाली होती. त्यावरून त्यांचा शोध घेऊन पोलिसांनी दोघांना ही ताब्यात घेऊन गुन्हा दाखल केला. त्यानंतर पोलीस कोठडी रिमांड घेवुन त्यांची चौकशी केली असता त्यांनी इतरही मोटरसायकल चोरी केल्याची कबुली दिली. ज्यात औरंगाबाद शहरातुन प्रोझोन मॉल, शहागंज, सावरकर चौक सिडको, साखरे मंगल कार्यालय समोरून, हर्सूल टी पॉईंट, सेव्हन हिल या ठिकाणाहून विविध कंपन्याच्या मोटार सायकल चोरी केल्याची त्यांनी कबुली दिली आहे. या दोन्ही आरोपींच्या ताब्यातुन हिरो एच.एफ.डिलक्स, सिडी डिलक्स, हिरो स्पेलन्डर, होंडा शाईन अशा एकुण 1 लाख 20 हजार रुपये किंमतीच्या मोटरसायकल जप्त करण्यात आल्या आहे.

## दुसऱ्या कारवाईत मोबाईल चोर ताब्यात

क्रांतीचौक पोलिसांनी मोठी कारवाई करत एका मोबाईल चोराला ताब्यात घेऊन त्यांच्या ताब्यातून 14 मोबाईल जप्त केले आहे. शटर फोडुन मोबाईल चोरणाऱ्या एका व्यक्ती बाबत पोलीस निरिक्षक जी. एच. दराडे यांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली होती. चोरीस गेलेले मोबाईल विकण्यासाठी हा व्यक्ती संजयनगर बायजीपुरा येथे येणार असल्याची माहीती त्यांना मिळाली होती. त्यामुळे त्यांनी मिळालेल्या माहितीच्या आधारे विशेष पथकाला संजयनगर, बायजीपुरा भागात पाठवत सापळा रचला. यावेळी एक संशियत व्यक्ती संजयनगर येथे चोरीचे मोबाईल विक्री करतांना मिळून आला. त्यामुळे त्यास तात्काळ ताब्यात घेवुन पोलीसांनी नाव पत्ता विचारले असता त्याने, त्याचे नाव हसन खान कलंदर खान (वय 23 वर्ष रा. अलंकार टॉकीज जवळ कबाडी मोहल्ला, जालना) असे सांगितले. त्यानंतर पोलिसांनी अधिक चौकशी केली असता त्याने मोबाईल चोरी केल्याचे कबुल केले. यावेळी त्याने चोरलेल्या मुद्देमालापैक एकुण 1 लाख 34 हजार रुपये किंमतीचे विवीध कंपन्यांचे 14 मोबाईल जप्त करण्यात आले.




## एफआयआरला उशीर, बलात्काराचा आरोप असलेल्याला जामीन मंजूर! कोटार्चा महत्त्वपूर्ण निर्णय

मुंबई : मुंबई सत्र न्यायलायने एक महत्त्वपूर्ण निकाल दिला आहे. बलात्काराचा आरोप असलेल्या एका आरोपीला जामीन मंजूर करताना कोर्टानं महत्त्वाचं निरीक्षण नोंदवलं. एफआयआर दाखल करण्यास उशीर झाल्याने आरोपीला जामीन मंजूर करत असल्याचं कोर्टानं म्हटलंय. सोबत एफआयरमधील अनेक गोष्टी विसंगत असल्याचा युक्तिवाद आरोपीच्या वकिलांकडून करण्यात आला होता. मुंबई सत्र न्यायालयात काळा चौकी पोलीस स्थानकात दाखल करण्यात आलेल्या



बलात्काराच्या तक्रारीवर सुनावणी पार पडली. एका विवाहितेनं आपल्यावर बलात्कार करण्यात आल्याचा आरोप केला होता. या आरोपांबाबतची पोलीस तक्रार उशिरा दाखल करण्यात आल्याचं कोर्टाच्या निदर्शनास आलं. त्याचप्रमाणे या तक्रारीत विसंगती असल्याचंही सकृत दर्शनी पुराव्यांच्या आधारे आढळून आल्यानं कोर्टानं आरोपीला दिलासा दिलाय. आरोपीला अटीशर्थीसह जामीन मंजूर करण्यात आला.

**नेमकं काय प्रकरण?**

दिलेल्या वृत्तानुसार, फेसबुकवर तक्रारदार महिलेची एका पुरुषाशी ओळख झाली होती. त्यानंतर या पुरुषासोबत मैत्री झालेल्या या ...पान २ वर...

## सोन्याची नाणी सांगून पितळेची नाणी देवुन फसवणूक करणाऱ्या 4 आरोपींना विरार पोलिसांनी केली अटक



विरार : गुन्हे शाखा, कक्ष-३ विरार यांनी सोन्याची नाणी सांगून पितळी धातूची नाणे देवून फसवणूक करणाऱ्या टोळीला अटक केली .मिळालेल्या माहितीनुसार दिनांक २५/०७/२०२२ रोजी संध्याकाळच्या वेळेस सुनिल प्रविणचंद्र चोक्सी यांना एका अनोळखी व्यक्तीने पंचवटी हॉटेल जवळील भाजी मार्केट वसई (पश्चिम) येथे भेटून त्याच्या जवळ ५ किलो सोन्याचे पाने आहेत असे सांगून त्यांचा विश्वास संपादन करून त्यांच्याकडील १२,००,०००/- रुपये रोख रक्कम त्यांना देण्यास भाग पाडुन चोक्सी यांना सोन्याचे पाने न देता पितळी धातुचे पाने देवुन त्यांची फसवणूक करून पळुन गेला होता. सदरबाबत चोक्सी यांनी अज्ञात आरोपी विरुध्द दिलेल्या तक्रारीवरून वालीव पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंद करण्यात आला होता.

मिरा-भाईदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रात जमीनीत गाडलेले पुरातन सोन्याचे नाणे मिळालेले आहे असे भासवुन ते कमी किंमतीत विक्री करण्याचा बहाणा करुन नागरिकांची फसवणुक करण्या-या गुन्हयांमध्ये दिवसेंदिवस वाढ झाली होती. सदर ...पान २ वर...

## बनावट चलनी नोटांसह एकाला अटक



बनावट चलनी नोटांची विक्री करण्यासाठी आलेल्या एका आरोपीला घाटकोपर पोलिसांनी अटक केली. या आरोपीकडून पोलिसांनी पाचशे रुपयांच्या एकूण ४० नोटा हस्तगत केल्या असून याप्रकरणी पोलीस अधिक तपास करीत आहेत. घाटकोपरमधील सर्वोदय सिग्नल परिसरातील सेंट्रल बँकेजवळ एक इसम बनावट नोटा घेऊन येणार असल्याची माहिती घाटकोपर पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार घाटकोपर पोलीस ठाण्यातील गुन्हे प्रकटीकरण विभागाच्या पथकाने रविवारी रात्री परिसरात सापळा रचला. संबंधित वर्णन असलेला इसम पोलिसांच्या दृष्टीस पडला. पोलिसांनी तत्काळ झडप घालून त्याला ताब्यात घेतले. झडती घेतली असता त्याच्याजवळ ५०० रुपयांच्या एकूण ४० बनावट नोटा सापडल्या. सर्जेराव पाटील (५५) असे या आरोपीचे नाव असून त्याने या नोटा कुठून आणल्या याबाबत पोलीस अधिक तपास करीत आहेत.

## राष्ट्रीय महामार्गावर दरोडा टाकणा या टोळीतील आरोपीना शिताफीने पकडण्यात गुन्हे शाखा, कक्ष 3 विरार यांना यश

मिरा भाईंदर, वसई विरार पोलीस आयुक्तालय हद्दीतील राष्ट्रीय महामार्गावर घडणा या गुन्हयांची वरिष्ठ पोलीस अधिका-यांनी गांभिर्याने दखल घेवुन सदर गुन्हयातील आरोपीत यांचा शोध घेवुन प्रभावीपणे पायबंद करणे बाबत सुचना दिल्या होत्या. त्याअनुषंगाने दिनांक २७/०८/२०२२ रोजी ०३.२० वा. ते ०४.२५ वा. चे दरम्यान लिनीट एक्सपोर्ट प्रा. लि. परमार इंडस्टीयल इस्टेट वसई फाटा जवळ, नालासोपारा पुर्व, ता. वसई, जि. पालघर. येथे फिर्यादी नामे श्री.मनोज राणे वय ४० वर्ष धंदा नोकरी रा. प्रेम वलभ हाल जवळ आगाशी रोड विरार प ता. वसई, जिल्हा पालघर यांचे लिनीट एक्सपोर्ट प्रा. लि.या कंपणीत ०८ इसमांनी प्रवेश करुन वाचमन यांना मारहाण करुन त्यांचे जबरदस्तीने हात पाय बांधुन ठेवले. त्यानंतर आयशर



कंपणीचा टेम्पो गेट मध्ये घेवुन त्यात त्यांनी गोडावुन मध्ये ठेवलेले स्टेनलीस स्टीलचे राड किंमत ३,७८,०००/ रुपये असा माल आयशर टेम्पोमध्ये भरुन जबरी चोरी करुन निघुन गेले होते. संदरबाबत पेल्हार पोलीस ठाणे गुन्हा रजि नंबर ७२७/२०२२ भा.दं.वि.सं. कलम ३९५,३४१ प्रमाणे अज्ञात आरोपीविरुध्द दरोडयाचा गुन्हा नोंद करण्यात आला होता. सदर गुन्ह्यातील अज्ञात आरोपीतांचा शोध होण्याच्या अनुषंगाने पोलीस उप आयुक्त गुन्हे, सहाय्यक पोलीस आयुक्त, गुन्हे यांनी दिलेल्या सुचना व मार्गदर्शनाप्रमाणे गुन्हे शाखा कक्ष ३ विरारचे पोलीस पथकाने वेगवेगळे पथक तयार करुन गुन्हयातील आरोपीत यांचा तांत्रीक विश्लेषण व गुप्त बातमीदार यांचे मार्फतीने माहिती प्राप्त करुन गुन्हा घडल्याच्या ३६ तासाच्या आत सापळा रचुन आरोपीत नामे १) ब्रदीआलम मेहमुद अली खान ...पान २ वर...

## 56 दुकानांत चोरी करणाऱ्या चोरट्याला बोरिवली पोलिसांकडून अटक



मुंबई मुंबई बोरीवली पोलीस ठाण्याच्या तपास पथकाने आतापर्यंत ५६ हून अधिक दुकानांमध्ये चोरी करणाऱ्या मुख्य चोराला अटक केली आहे. ३५ वेळा तुरुंगात गेला आहे. या बदमाश चोराने विज्ञान शाखेतून पदवीचे शिक्षण घेतले आहे. मात्र, मुंबई आणि गुजरातमध्ये त्याने आतापर्यंत शेकडो दुकानांमध्ये चोऱ्या केल्या आहेत. तो दर गुरुवारी रात्री 5 ते 6 दुकानात चोरी करण्यासाठी अहमदाबादहून मुंबईत यायचा आणि नंतर खासगी वाहन पकडून अहमदाबादला परतायचा.

बोरीवली पोलिसांकडून आरोपीला अटक बोरीवली पोलिसांनी त्याच्याकडून कटर, रॉड, पाईप, स्क्रू ड्रायव्हर, कटावणी जप्त केली आहे. बोरीवलीतील दुकानांमध्ये चोरीचे पाच गुन्हे दाखल आहेत, तर उत्तर मुंबईतील डझनाहून अधिक दुकानांमध्ये चोरीचे गुन्हे दाखल आहेत. अथक परिश्रमानंतर आरोपीला अटक करण्यात आली आहे. अतिशय हुशार असलेल्या या चोरट्याने कार आणि मोबाईलही चोरला आहे. आतापर्यंत या आरोपीला गुजरातमध्ये 35 वेळा अटक दारसल बोरिवलीचे वरिष्ठ पीआय निनाद सावंत यांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी ...पान २ वर...

## मेट्रोसह इतर पायाभूत सुविधांची कामे कालबद्धरितीने युद्ध पातळीवर करा

### मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे वॉर रुम बैठकीत निर्देश

मुंबई, राज्यातील पायाभूत सुविधांचे प्रकल्प गतीने आणि कालबद्धरित्या पूर्ण करण्यासाठी युद्ध पातळीवर संबंधित विभागांनी काम करावे तसेच प्रलंबित बाबी, आवश्यक परवानग्या या तातडीने मिळवून घ्याव्यात. विशेषतः अहमदाबाद-मुंबई हायस्पीड रेल्वेशी (बुलेट ट्रेन) संबंधित भूसंपादन, मोबदला, जागा हस्तांतरण हे विषय 30 सप्टेंबर पूर्वी मार्गी लावण्याचे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले. मुख्यमंत्र्यांनी आज उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह मंत्रालयातील वॉर रूम मधून राज्यातील महत्त्वाच्या पायाभूत सुविधांच्या अंमलबजावणीचा आढावा घेतला त्यावेळी ते बोलत होते.

प्रकल्प रेंगाळल्यास त्याचा खर्चही वाढतो त्याचप्रमाणे लोकांना सुविधा देखील मिळण्यास उशीर होतो. केंद्र सरकार विविध प्रकल्पांना मान्यता देत असून राज्याने देखील याचा फायदा करून घेतला पाहिजे आणि पाठपुरावा करून योजना मार्गी लावल्या पाहिजेत यावर



मुख्यमंत्र्यांनी आजच्या बैठकीत भर दिला.

आजच्या बैठकीत रेल्वे, मेट्रो, मल्टीमोडल कॉरिडॉर, तुळजापूर पंढरपूर अशा काही पायाभूत सुविधा प्रकल्पांचा आढावा घेण्यात आला.

#### बुलेट ट्रेन : भूसंपादन, मोबदला विषयक कामांना गती द्या

मुंबई ते अहमदाबाद अशी 508.17 कि.मी. लांबीचा हाय स्पीड रेल्वे प्रकल्प (बुलेट ट्रेन) असून यासाठी एक लाख 8 हजार कोटी खर्च आहे. गुजरात आणि महाराष्ट्रात मिळून एकूण 12 स्थानके असून महाराष्ट्रात त्यातील 4 स्थानके आहेत. मुंबईतील 1 स्थानक वगळून उर्वरित तीनही स्थानके उन्नत प्रकारातील आहेत. यासाठी जपान सरकारने कर्ज दिले असून 50 टक्के खर्चाचा वाटा केंद्र सरकार तर 25 टक्के वाटा महाराष्ट्र आणि 25 टक्के गुजरात सरकार उचलणार आहे. यासाठी एमएमआरडीए मधील 4.8 हेक्टर जागा भूमिगत स्थानकासाठी 30 सप्टेंबर पर्यंत उपलब्ध करून घेण्याची कार्यवाही एमएमआरडीएने करण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले. तसेच भूसंपादन, मोबदला, जमीन हस्तांतरण या बाबी देखील पालघर तसेच ठाणे जिल्हाधिकाऱ्यांनी देखील 30 सप्टेंबर पर्यंत पूर्ण कराव्यात असेही त्यांनी सांगितले.

#### मेट्रो मार्गासाठी भूसंपादन वेगाने करा

आजच्या बैठकीमध्ये बुलेट ट्रेन व्यतिरिक्त मुंबई मेट्रो मार्ग-3, 4,5,6,9 आणि 11 यांचा त्याचप्रमाणे ...पान २ वर...

## विधान भवनाबाहेर आत्महत्येचा प्रयत्न करणाऱ्या त्या व्यक्तीचा मृत्यू



मुंबई - विधान भवनाबाहेर आत्महत्येचा प्रयत्न करणाऱ्या सुभाष उंदरे या व्यक्तीचा आज रुग्णालयात उपचारा दरम्यान मृत्यू झाला आहे. उंदरे यांना जेजे रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. पावसाळी अधिवेशन सुरू असताना विधिमंडळाबाहेर आत्महत्या करण्याचा प्रयत्न करणाऱ्या सुभाष उंदरे या व्यक्तीचा आज मृत्यू झाला आहे. शेतीच्या घरगुती वादातून उंद्रे यांनी आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला होता. उपचारा दरम्यान त्यांचा आज मुंबईतील जे जे रुग्णालयात मृत्यू झाला.विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनादरम्यान मंगळवारी 23 ऑगस्ट रोजी विधान भवनाबाहेर सुभाष उंद्रे या 56 वर्षीय व्यक्तीने आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला होता. त्यांना तातडीने जे जे रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. दरम्यान या आत्महत्येच्या प्रयत्नात सुभाष उंदरे हे ५६ टक्के भाजले होते. का केला होता आत्महत्येचा प्रयत्न - उस्मानाबाद जिल्ह्यातील वाशी तालुक्यातील तांदुळवाडी या गावचे सुभाष उंदरे हे रहिवासी होते. त्यांनी गावातील शेतीच्या संदर्भात असलेल्या वादातून त्यांच्या दोन भावांमध्ये आणि त्यांच्यामध्ये वाद होता या वादाची पोलिसांकडे तक्रार करूनही दखल घेतली जात नाही या कारणास्तव उंद्रे यांनी आत्महत्येचा प्रयत्न केला होता. त्यांना भाजलेल्या अवस्थेत जे जे रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले तेव्हा ते 45 टक्के भाजले होते. गेले काही दिवस मृत्यूशी झुंज देत असलेल्या सुभाष उंद्रे यांचा आज सकाळी पावणे बारा वाजता जे जे रुग्णालयात मृत्यू झाल्याची माहिती जेजे रुग्णालयाचे अधीक्षक डॉक्टर संजय सुरासे यांनी दिली आहे.

# शरद पवारांचे मोदी सरकारवर टीकास्त्र:'अच्छे दिन' आले नाहीत, भाजपने 2014 ला दिलेली आश्वासनं पूर्ण केली नाहीत

राज्यात अनेक प्रश्न आहेत, राज्याचे आणि देशाचे सूत्र हातात असलेले एकाच विचाराचे आहेत. निवडणूकांना सामोरे जाताना सत्ताधारी पक्षाने अच्छे दिन अशी घोषणा केली होती, त्यानंतर अच्छे दिन नागरिकांना दिसले नाही. पुढच्या निवडणूकीच्या वेळी त्याचे विस्मरण झाले. आता 2024 साठी आता 5 ट्रीलियन इकॉनॉमी हे नवीन आश्वासन दिले जात आहे, असे म्हणत राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांनी भाजपवर टीका केली.

मी महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांचा दौरा करून आढावा घेणार आहे. पक्षातील वरिष्ठ नेत्यांनी जिल्ह्यात जाऊन स्थानिक परिस्थितीचा आढावा घ्यावा. राष्ट्रवादी नेते अजित पवार यांनी विदर्भाचा दौरा केला.

मी देखील काही निवडक जिल्ह्यात जात आहे. त्यांची सुरुवात मी आजपासून ठाण्यापासून केली आहे, असे त्यांनी सांगितले.



**आश्वासने अपूर्ण**

2022 पर्यंत प्रत्येकाजवळ हक्काचे पक्के घर असेल, प्रत्येक घरात पाण्याचा नळ असेल, 2018 पर्यंत राज्यातील प्रत्येक ग्रामपंचायतीत इंटरनेट सुविधा असेल. डिजिटल इंडीयाचा नारा देण्यात आला होता. पण तसे झाले नाही. 2022 पर्यंत देशातील प्रत्येक घराला टॉयलेट उपलब्ध असेल हे आश्वासन देखील पूर्ण झाले नाही. 44 टक्के देशातील लोकांना अजुनही वीज मिळालेली नाही, ही आकडेवारी केंद्राची आहे, असे ते म्हणाले. यावेळी पवारांनी भाजपने दिलेल्या आश्वासनाची यादी देखील वाचून दाखवली

**सरकारे पाडण्याचे कृत्य**

पुढे पवार यांनी सांगितले की, विरोधी पक्ष जर सत्तेत असतील तर त्यांना सत्तेतून बाजूला करण्याचा प्रयत्न होत आहे. माणसे फोडणे, साधणांचा वापर करणे आणि ईडीसारख्या यंत्रणांचा वापर करून सत्ता मिळवण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे गंभीर चित्र आहे. कर्नाटकमध्ये सुध्दा असे प्रकार झाले. महाराष्ट्रामध्ये सुध्दा उध्दव ठाकरे यांच्या पक्षातील काही लोक फोडले आणि सरकार स्थापन केले. त्यामुळे देशातील बिगरभाजप पक्षांच्या नेत्यांशी सुसंवाद साधून लोकशाही मार्गाने आलेली सरकारे पाडण्याचे जे कृत्य सुरू आहे, त्याविरोधात जनमत तयार करण्यासाठी लढा उभा करण्याचा आम्ही विचार करत आहोत

**महिलांवर अत्याचार**

महिलाच्या सुरक्षेवर बोलताना शरद पवार म्हणाले की, मोदी यांचं 15 ऑगस्टच भाषण ऐकल, त्यामधे स्त्री वर्गाबाबत ते बोलले होते. पण, भाजपच्या काळात महिलांवर होणाऱ्या अत्याचाराच्या संख्येत दिवसेंदिवस वाढ होत आहे. बिल्कीस बानो प्रकरणातील आरोपींना गुजरात सरकारने त्यांना सोडले आणि त्यांचा जाहीर सत्कार करण्यात आला.

मोदींच्या राज्यात एका महिलांवर अत्याचार करणाऱ्या आरोपींना सोडण्यात आले आहे. हे अत्यंत चिंताजनक चित्र आहे.

# खोपोलीत खड्ड्याचा अंदाज न आल्याने बस पलटी, 20 प्रवासी जखमी

खोपोली : जुन्या पुणे मुंबई महामार्गावर खंडाळयाहून खोपोलीकडे शिंग्रोबा बायपास ने उतरत असताना अवघड वळणावर बस चालकाला बस कंट्रोल न झाल्याने बस खड्यात गेल्याने पलटी मारली. ज्यावेळी बसने पलटी मारली त्यावेळी बसमध्ये एकूण 35 प्रवासी होते. त्यापैकी 15 ते 20 जण किरकोळ जखमी झाले आहेत. त्यांना रुग्णवाहिकेमधून खोपोली नगरपालिका हॉस्पिटलमध्ये दाखल केले आहे. अपघातग्रस्तांच्या मदतीची संस्था आणि महामार्ग पोलीस घटनास्थळी दाखल होऊन अपघातग्रस्त बस बाजूला केली आहे. या अपघातामुळे काही काळ घटनास्थळावरील वाहतूक ठप्प झाली होती. खड्ड्याचा अंदाज न आल्याने बस पलटी मारली

आज जुन्या रस्त्याने जात असताना खड्डा चुकवण्याच्या नादात एक बस खड्ड्यात गेली. त्यावेळी बसमध्ये एकूण २० प्रवासी असल्याची माहिती मिळाली आहे. खड्ड्याचा अंदाज न आल्याने बस पलटी मारली. त्यावेळी अपघातामध्ये जखमी झालेल्या प्रवाशांना जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. ज्यावेळी हा अपघात झाला. त्यावेळी तिथं वाहतुक कोंडी मोठ्या प्रमाणात झाली होती. नवीन पुणे मुंबई महामार्गावरती प्रचंड गाड्या असतात नवीन पुणे मुंबई महामार्गावरती प्रचंड गाड्या असतात. तसेच त्यांचं स्पीड देखील प्रचंड असतं. ज्यांना नव्या रस्त्याने जाणं शक्य नाही अशी लोकं जुन्या रस्त्याचा अधिक वापर करीत आहेत.

# 'त्या' काँग्रेस ऑफरवर पूर्णविराम:नितीन गडकरी थेटच म्हणाले - विहिरीत उडी घेईन, पण काँग्रेसमध्ये जाणार नाही

मला विद्यार्थी दशेत काम करत असताना उज्ज्वल भविष्यासाठी काँग्रेस नेते श्रीकांत जिचकार यांनी काँग्रेस प्रवेशाची ऑफर दिली होती. यावेळी गडकरींनी जिचकरांना सांगितले होते की, मी विहिरीत उडी घेईल, पण काँग्रेसमध्ये जाणार नाही. मला काँग्रेसची विचारधारा मान्य नाही. हा जुना किस्सा काल नितीन गडकरी यांनी नागपुरात उद्योजकांच्या एका समिटला संबोधित करताना सांगितला.




**गडकरींनी किस्सा सांगत संपवली चर्चा**

गडकरी यांना भाजपच्या संसदीय मंडळातून काढण्यात आले आहे. यावेळी राजकीय वर्तळात सुरू असलेली गडकरींच्या काँग्रेस प्रवेशाच्या चर्चेला त्यांनी स्वतःच पूर्णविराम दिला आहे. ते नाराज असल्याच्या चर्चा ही सुरू होत्या. यानंतर त्यांची गेल्या काही दिवसांतील भाषणे पाहिली तर ते सध्याच्या राजकारणाला कंटाळले असल्याचे जाणवत होते यात ते म्हणाले की, आजकाल राजकारण समाजकल्याणासाठी राहिले नसून सत्तेसाठी असल्याचे त्यांनी म्हटले होते. यानंतर नितीन गडकरी पक्षातून बाहेर पडणार का? अशी चर्चा होती. मात्र, एकप्रकारे गडकरींनी पुन्हा एकदा हा किस्सा सांगत या चर्चांना पूर्णविराम दिला आहे.

**नेमके काय म्हणाले गडकरी?**

मी विद्यार्थी दशेत काम करत असताना मला श्रीकांत जिचकरांनी उज्ज्वल भविष्यासाठी काँग्रेसमध्ये प्रवेश करावा असे म्हटले होते, पण मी त्यांना म्हणालो की, विहिरीत उडी घेईल; पण काँग्रेसमध्ये जाणार नाही, काँग्रेसची विचारधारा मला मान्य नाही.

राजकीय विषयावर बोलताना गडकरींनी युवा उद्योजकांना सल्लाही दिला आहे. यात त्यांनी भाजपला अप्रत्यक्षपणे इशाराच दिला आहे, असेही म्हटलं जात आहे. गडकरी म्हणाले, की 'कोणाचे वाईट दिवस असो किंवा चांगले दिवस असो. एकदा कोणाचा हात धरला की त्याची साथ सोडू नका. उगवत्या सूर्याची पूजा करू नका. युज अँड थ्रो पॉलिसी चांगली नाही, असे नितीन गडकरी यावेळी बोलताना म्हणाले.

# मधुमेह असल्यास ही फळं खाणे टाळा

## अन्यथा टोमॅटो फ्लूचे होणार शिकार; देशात 100 जणांना लागण, मुलांच्या अंगावर येतात लाल रंगाचे फोड




तुम्हाला तुमच्या कुटुंबाच्या आरोग्याची चांगली काळजी घेण्यासाठी मदत करण्यासाठी आम्ही 'वीकली हेल्थ ब्रीफ' घेऊन आलो आहोत. यामध्ये तुम्हाला प्रमुख आरोग्य अपडेट्स, संशोधनाशी संबंधित महत्त्वाचा डेटा आणि डॉक्टरांकडून संबंधित सल्ले मिळतील. हे वाचून तुम्हाला आरोग्याशी संबंधित महत्त्वाची माहिती मिळेल आणि तुम्ही कुटुंबाची देखील चांगली काळजी घेऊ शकाल.

1. देशातील नवीन रोग- टोमॅटो फ्लू

कोविड-19 आणि मंकीपॉक्स नंतर देशात एका नवीन संसर्गजन्य आजाराने दार ठोठावले आहे. 'टोमॅटो फ्लू' नावाच्या या आजाराने आतापर्यंत 100 हून अधिक जणांना लागण झालेली आहे.

जाणून घेऊया टोमॅटो फ्लू बद्दल

हा एक संसर्गजन्य रोग आहे, जो मुख्यतः मुलांना प्रभावित करतो.

त्याची लक्षणे कोविड-19 सारखीच आहेत, परंतु हा पूर्णपणे वेगळा आजार आहे.

भारतातील पहिला रुग्ण केरळमध्ये आढळला होता, आतापर्यंत सुमारे 100 रुग्ण आढळले आहेत.

याचा प्रादुर्भाव झाला की अंगावर टोमॅटोसारखे लाल व गोल फोड येतात.

डेंग्यू आणि चिकुनगुनियानंतर त्याचा धोका वाढतो, असे तज्ज्ञांचे मत आहे.

डॉक्टर त्याला HFMD म्हणजेच हात, पाय, तोंडाचे आजार म्हणतात.

हे कॉक्ससॅकीव्हायरस आणि एन्टरोव्हायरसच्या गटांमुळे होते.

2. अन्ननलिकेचा कर्करोग होण्याचा धोका तीन पटीने जास्त वाढतो

जर तुम्हाला जास्त गरम चहा किंवा कॉफी पिण्याची सवय असेल तर तुम्ही काळजी घेणे आवश्यक आहे. इंग्लंडमधील केंब्रिज विद्यापीठाच्या एका संशोधनात असे आढळून आले आहे की, जे लोक जास्त गरम कॉफी किंवा चहा पितात त्यांच्या घशातील अन्ननलिकेचा कर्करोग होण्याचा धोका जवळपास तीन पटीने जास्त असतो.

जर्नल ऑफ क्लिनिकल न्यूट्रिशनमध्ये प्रकाशित झालेल्या एका संशोधनानुसार, जे अधिक कॉफी किंवा चहा पितात त्यांच्यामध्ये अन्ननलिकेचा कर्करोग (अन्ननलिकेतील कर्करोग) होण्याचा धोका 2.8 पट जास्त असतो. अभ्यास दर्शविते की जे लोक कमी गरम चहा किंवा कॉफी पितात त्यांना कर्करोगाचा धोका 2.7 पट जास्त असतो. तर, जे गरम किंवा खूप गरम चहा किंवा कॉफी पितात त्यांच्यामध्ये हा धोका 5.5 पटीने वाढतो. रात्री झोपण्यापूर्वी ऑनलाइन स्क्रोल करणे तुमच्या आरोग्यासाठी हानिकारक ठरू शकते. रात्री सोशल मीडियावर ऑनलाइन राहण्याच्या सवयीला रिव्हेंज बेड टाइम प्रोक्रॅस्टिनेशन असे म्हटले जाते.


## मिरा भाईंदर महानगरपालिका

### पशुसंवर्धन विभाग

जा.क्र.मनपा/पशुसंवर्धन/७६/२०२२-२३.

दिनांक :- २३/८/२०२२.

### // जाहिर निविदा सुचना //

मिरा भाईंदर महानरगरपालिका कार्यक्षेत्रातील मोकाट कुत्रे व मोकाट मांजरावर निर्बिजीकरण व लसीकरण करणे, जखमी कुत्रे व मांजरांवर उपचार करणे तसेच पिसाळलेले कुत्रे व मांजरे यांचा बंदोबस्त् करणे. या कामाची E-Tendering पध्दतीने निविदा मागविण्यात येत आहेत. सदर कामाची कोरी निविदा पत्रके दि. २५/०८/२०२२ ते दि. १२/०९/२०२२ रोजीपर्यंत शासनाच्या E-Tendering संकेतस्थळ www.mahatenders.gov.in येथे उपलब्ध होतील. निविदाधारकाने निविदा फॉर्म व इसारा रक्कम ऑन लाईन रिसिप्ट सिस्टिमद्वारे भरणा करावी. अन्यथा निविदा ग्राह्य समजण्यात येणार नाही.

सदर कामी मागविलेल्या निविदा E-Tendering पध्दतीने दि. १४ /०९ /२०२२ रोजी दुपारी १.०० वाजेपर्यंत वरील संकेतस्थळावर स्विकारण्यात येतील व शक्यतो त्याच दिवशी दुपारी ४.०० वा उघडण्यात येतील.

| अ. क्र. | कामाचे नाव | कोऱ्या निविदा पत्रकाची किंमत | निविदा बयाणा रक्कम |
|---|---|---|---|
| १. | संस्थेच्या डॉग वॅन मधून संस्थेच्या प्रशिक्षित कर्मचा-यांमार्फत मस्किटो नेटचा उपयोग करुन महानगरपालिका क्षेत्रातील नसबंदी न झालेले मोकाट श्वान व मांजरे पकडणे. पकडलेले श्वान व मांजरे शिरे-गावठण, उत्तन येथील प्रकल्पावर नेणे. प्रकल्पावर निर्बिजीकरण झालेल्या श्वाने / मांजरे बरे होईपर्यंत खानपान व्यवस्था करणे व त्या ठिकाणाहुन पकडले त्या ठिकाणी सोडणे. | मूळ किंमत ३००० + १८०० + (GST १८%) ८६४ = ५६६४/- | रू. ८०,०००/- |

टीप :- १. निविदा दोन लिफाफा पदध्तीने (ऑनलाईन) सादर कराव्यात.
२. निविदा फॉर्म फी परत केली जाणार नाही.
३. आलेल्या निविदा मधील कोणतीही एक निविदा स्विकारण्याचा किंवा सर्वच निविदा नाकारण्याचा अधिकार महानगरपालिकेने राखून ठेवलेला आहे. त्याबद्दल कोणतेही स्पष्टीकरण दिले जाणार नाही.

जा.क्र मनपा/जनसंपर्क/ २३८/ २०२१-२२
दिनांक २६/०८/२०२१

उप-आयुक्त (पशुसंवर्धन)
मिरा भाईंदर महानगरपालिका


## एफआयआरला उशीर, बलात्काराचा आरोप

महिलेवर बलात्कार करण्यात आला. फेसबुकवर मैत्री केलेल्या या पुरुषानेच आपल्यावर बलात्कार केला, असा आरोप तक्रारीतून करण्यात आला होता. याच पुरुषासोत आपले प्रेमसंबंधही होते, असंही तक्रारदार महिलेनं आपल्या तक्रारीत म्हटलं होतं. आपल्या जबाबात परस्परविरोधाभास आढळला आहे, असा युक्तिवाद आरोपीच्या वकिलांकडून करण्यात आला. त्यानंतर यात तथ्य असल्याचं आढळल्यानं न्यायमूर्ती माधुरी देशपांडे यांनी आरोपी प्रतिक कुरडे यांस जामीन मंजूर केला. 30 हजार रुपयांच्या जातमुचलक्यावर अटीशर्थींसह बलात्काराचा आरोप करण्यात आलेल्या प्रतिकला कोर्टाने जामीन दिला.

## सोन्याची नाणी सांगून पितळेची

गुन्हयांची वरिष्ठांनी गांभीर्याने दखल घेवुन अश्या गुन्हयांना आळा घालण्यासाठी व आरोपीचा शोध घेण्याबाबत पोलीस पथकास सुचना दिल्या होत्या. त्याअनुषंगाने गुन्हे शाखा कक्ष ३ विरार मधील कार्यरत अधिकारी व अंमलदारांची वेगवेगळी स्वतंत्र पथके तयार करुन गुन्हयातील आरोपींचा तांत्रिक विश्लेषण व गुप्त बातमीदार यांचे मार्फतीने माहिती प्राप्त करुन शोध घेतला व आरोपी १) विशाल धर्मा राय, वय १९ वर्षे, रा. जैन नगर, खेडा फिरोजाबाद, राज्य उत्तर प्रदेश., २) संजु वालीया राय, वय २७ वर्षे, रा. घर नंबर ३५४, सुशीला विहार २ , बुलंद शहर, राज्य उत्तर प्रदेश, ३) शिवराम हिरालाल माली, वय ५७ वर्षे, रा. , जैन नगर, खेडा फिरोजाबाद, राज्य उत्तर प्रदेश, ४) मिना रामलाल सोलंकी, वय ४५ वर्षे, रा. गुप्ता मेडीकल जवळ, जैन नगर, खेडा फिरोजाबाद, राज्य उत्तर प्रदेश यांना अंदाजे ५ किलो वजनाच्या पिवळया रंगाचे बनावट सोन्याचे पाने, मनी व मन्यांची माळ अशा मुद्देमालासह पोलिसांनी ताब्यात घेतले असून सदर गुन्हयाचा पुढील तपास वालीव पोलीस ठाणे करीत आहे.

सदरची कामगिरी श्री. विजयकांत सागर, पोलीस उप आयुक्त (मुख्यालय), अति.कार्यभार (गुन्हे), श्री. अमोल मांडवे, सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली पो.नि.प्रमोद बडाख, पो.उप.निरी. शिवाजी खाडे, उमेश भागवत, पो.हवा. अशोक पाटील, मनोज चव्हाण, मुकेश तटकरे, शंकर शिंदे, सचिन घेरे, सागर बारवकर, पो.ना. मनोज सकपाळ, पो.अं.राकेश पवार, अश्विन पाटील, सुमित जाधव सर्व नेम- गुन्हे शाखा, कक्ष ३ विरार यांनी पार पाडली आहे.

## राष्ट्रीय महामार्गावर दरोडा

वय 53६ वर्षे, 2) ईरशाद शौकत अली वय ५४ वर्षे, ३) मोहम्मद रफिक इद्रीस शहा वय २७ वर्षे, ४) मोहम्मद तोफीक शेख वय ३७ वर्षे, ५) मजहर ईरशाद अली खान वय २१ वर्षे, ६) नजिर अहमद सोराब अली शेख वय ४० वर्षे, ७) हाफिजउल्ला ईदउल्ला खान वय २९ वर्षे, यांना शिताफीने ताब्यात घेण्यात आले असुन त्यांचेकडे प्राथमिक तपासात त्यांचा सदर गुन्हयात सक्रीय सहभाग निष्पन्न झाला असुन ताब्यात घेण्यात आलेल्या आरोपीता पैकी आरोपीत नामे ब्रदीआलम मेहमुद अली खान वय 53६ वर्षे, याचेवर यापुर्वी नाशिक व ठाणे जिल्हयात अशाच प्रकारे गंभीर गुन्हे दाखल

## मेट्रोसह इतर पायाभूत

मेट्रो मार्ग 2 ए (दहिसर पूर्व ते डीएन नगर), मेट्रो मार्ग-7 (अंधेरी पूर्व ते दहिसर पूर्व), यांच्या कामकाजाचा आढावा घेतला. वडाळा ते कासारवडवली हा मेट्रो मार्ग-4 तसेच ठाणे ते कल्याण व्हाया भिवंडी हा मेट्रो मार्ग-5 या मार्गांसाठी भूसंपादन व हस्तांतरणाचे काम वेगाने पूर्ण करावे असे त्यांनी सांगितले.

**वडसा-गडचिरोली रेल्वे मार्ग**

वडसा-गडचिरोली रेल्वे मार्गासाठी प्रकल्पाची किंमत 1096 कोटी इतकी वाढली असून या संदर्भातील मंत्रिमंडळ प्रस्ताव तातडीने मान्यतेसाठी आणावा असे आदेश देतानाच त्यांनी वन विभागाशी संबंधित प्रलंबित बाबींही तातडीने निकाली काढण्याच्या सूचना वन विभागास दिल्या. या रेल्वे मार्गासाठी सुमारे 30 कोटी रुपयांचा वाटा राज्य सरकारने यापूर्वीच दिला आहे.

शिवडी-वरळी जोड रस्ता तसेच मुंबई ट्रान्स हार्बर लिंक याला देखील वेगाने पूर्ण करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. एमटीएचएलचे काम 84 टक्के पूर्ण झाले असून पुढच्या वर्षी ऑक्टोबर किंवा नोव्हेंबरमध्ये हे काम पूर्ण होईल अशी माहिती या बैठकीत देण्यात आली.

जलवाहिन्यांच्या कामाला गती द्यावी

सूर्या पाणी पुरवठा योजना पूर्ण होत आली असून पुढच्या वर्षीपासून नागरिकांना पाणी पुरवठा करणे शक्य होईल. मात्र यासाठी वसई-विरार महानगरपालिका तसेच मिरा-भाईंदर महानगरपालिकेने तातडीने जलवाहिन्या टाकण्यासाठी निविदा व इतर प्रक्रीया पूर्ण करण्यासाठी तातडीने पाऊले उचलण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.

पंढरपूर, तुळजापूर मंदिरांचा विकास आराखडा या बैठकीत पंढरपूर, तुळजापूर मंदिरांचा विकास आराखडा दोन महिन्यात सादर करावा, जेणेकरुन या ठिकाणी भाविकांना मोठ्या प्रमाणावर सुविधा देता येणे शक्य होईल. जिल्हाधिकाऱ्यांना पर्यटन विभागाशी समन्वयाने या संदर्भातील कार्यवाही तातडीने पूर्ण करावी अशाही सूचना देण्यात आल्या. पुणे-नाशिक सेमी हायस्पिड रेल्वे या मार्गाला निती आयोगाने देखील एप्रिल 2022 मध्ये मान्यता दिली असून केंद्राच्या अर्थविषयक व्यवहार मंत्रिमंडळ समितीची मान्यता बाकी आहे. यासाठी देखील खासगी जागेचे भूसंपादन, शासकीय व वन जमिनीचे हस्तांरण या बाबींना गती देण्याचे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी दिले. या व्यतिरिक्त पुणे मेट्रो, पुरंदर येथील प्रस्तावित विमानतळ, नागपूर येथील मेट्रो तसेच विमानतळ या कामांबाबत देखील या वॉर रुम बैठकीत चर्चा होऊन मुख्यमंत्री तसेच उपमुख्यमंत्र्यांनी कार्यवाहीचे निर्देश दिले. या बैठकीस मुख्य सचिव मनुकुमार श्रीवास्तव, मध्य रेल्वे तसेच हाय स्पीड रेल कार्पोरेशनचे अधिकारी तसेच एमएमआरडीए आयुक्त, जिल्हाधिकारी तसेच संबंधित विभागांचे सचिव उपस्थित होते.

## 56 दुकानांत चोरी करणाऱ्या चोरट्याला

अजित अर्जुन पिल्लई वय ३६ हा गुजरातचा रहिवासी आहे. त्याने एमएससी स्टॅटिक्समध्ये पदव्युत्तर पदवी संपादन केली आहे. वडील शिक्षक आहे, तर मुलगा मास्टर चोर आहे. आरोपी अजितने आतापर्यंत मुंबई, अहमदाबाद, वडोदरा, दोदरा, खेडा, गांधीनगर आदी भागांत ५६ हून अधिक दुकानांमध्ये चोरी केली आहे. ज्यामध्ये त्याला गुजरातमध्ये आतापर्यंत 35 वेळा अटक करण्यात आली आहे. आरोपी मोबाईल करायचा प्लाईटमोडवर बोरीवली क्राईम पीआयने दिलेल्या माहितीनुसार, हा मास्टर चोर अहमदाबादहून मुंबईला आल्यानंतर मोबाईल फ्लाइट मोड करायचा. त्यामुळे त्याच्या ठिकाणाची माहिती पोलिसांना मिळू शकली नाही. बोरीवलीच्या दुकानात 25 डिसेंबर 2021 रोजी कपड्याच्या दुकानात चोरी झाली होती. ज्यामध्ये तो कपडे आणि रोख रक्कम घेऊन पळून गेला होता. त्याच रात्री आरोपीने कांदिवली, मालाड, गोरेगाव येथील सुमारे 6 दुकानांमध्ये चोरी केली होती. घटनेनंतर तो ऑटोरिक्षा पकडून मुंबईहून घोडबंदर गाठायचा आणि खासगी वाहन पकडून गुजरातला पळून जायचा. आरोपी अजित दर गुरुवारी चोरी करायचा तपास अधिकारी एपीआय इंद्रजित पाटील आणि त्यांच्या पथकाला तपासात माहिती समोर आले की, मुंबईत आल्यानंतर आरोपी अजित दर गुरुवारी चोरी करायचा, मात्र चोरी करण्यापूर्वी तो तोंडाला मास्क आणि टोपी घालून ओळख लपवायचा. त्याच्याकडून दुकानांचे शटर ब्रेकर जप्त करण्यात आले आहे.

संपादकीय...



# ‘आझाद’ की ‘गुलाम’?

काँग्रेसचे नेते राहुल गांधी सप्टेंबरमध्ये महत्त्वाकांक्षी ‘भारत जोडो यात्रा’ काढणार आहेत. त्याच्या तोंडावर पक्षातील नाराज गटाचे नेतृत्व करणारे गुलाम नबी आझाद यांनी पक्षाला रामराम ठोकल्याने गांधी घराणे आणि विशेषतः राहुल गांधींच्या कार्यपद्धतीच्या चर्चेला तोंड फुटले आहे. त्याचवेळी आझादांनी नाराजीनाम्यातून काय साधले, हाही प्रश्न उपस्थित होत आहे.

जी -२३ चे प्रमुख समजले जाणारे काँग्रेसचे ज्येष्ठ नेते गुलाम नबी आझाद यांनी शेवटी पक्षाला रामराम ठोकला. ते पक्ष सोडणार होतेच. फक्त त्यासाठी वातावरणनिर्मिती करायला त्यांना दोन वर्षे लागली एवढेच. ऑगस्ट २०२०मध्ये काँग्रेसमधील बंडखोर गटाची निर्मिती करण्यात आझाद आघाडीवर होते. या गटाने खदखद मांडताना लेटरबॉम्बद्वारे काँग्रेसमधील अंतर्गत कलहाचा स्फोट घडवला होता. इंदिरा गांधी, राजीव गांधी, पी.व्ही. नरसिंहराव आणि डॉ. मनमोहन सिंग यांच्या मंत्रिमंडळात महत्त्वाची भूमिका बजावताना देशाने आझादांना पाहिले आहे. काँग्रेसने त्यांना जम्मू काश्मीरचे मुख्यमंत्री केले. गेल्या पाच दशकात पक्षाने त्यांच्यावर विश्वास दर्शवला. सन्मान दिला. महत्त्वाचा नेता म्हणून ओळख दिली. आझादांचा रोष असलेल्या राहुल गांधी यांच्या वयाइतका आझादांचा राजकीय प्रवास आहे. अशावेळी राहुल अपरिपक्व आहेत अशी टीका करून ते मोकळे कसे होऊ शकतात?

आझाद १९७३ मध्ये काँग्रेसमध्ये आले. तेव्हा राहुल जेमतेम तीन वर्षांचे होते. राहुल यांना अंगाखांद्यावर खेळवण्याची आझादांना कदाचित संधी मिळाली असेल. गांधी घराण्याजवळच्या आझादांना राहुलच्या आजीचे आणि वडिलांचे हौतात्म्य माहिती आहे. अशावेळी राहुल गांधी यांना राजकारणात परिपक्व करण्यासाठी आझादांचे योगदान नसावे? की सततच्या जबाबदाऱ्यांमुळे पक्षातील पुढची पिढी तयार करायला वेळच मिळाला नाही? भाजप नेते नरेंद्र मोदींच्या आव्हानाला तोंड देताना प्रचंड कष्ट उपसावे लागणार, याची जाणीव आझादांसह त्यांच्या लाभार्थी मित्रांनाही आहे. मात्र, ते कष्ट उपसावेत केवळ राहुल आणि सोनिया गांधींनी.

लोकसभेत जाता येत नसल्याने किमान राज्यसभेतील प्रवेशासाठी केविलवाणा प्रयत्न करूनही अपयश आल्याने राहुल गांधी यांना लक्ष्य करीत सत्ताधाऱ्यांना ताकद देण्याचे काम काँग्रेसमधील काही नेत्यांनी केले आहे. त्यात आझादांचा वरचा क्रमांक लागतो. ‘आझाद हे काँग्रेसमधील मोठे नेते आहेत. त्यांच्या पक्ष सोडण्यामुळे उरलीसुरली काँग्रेस संपेल’, अशा प्रतिक्रिया उमटत आहे. त्यांच्या राजीनाम्यानंतर देशभरातून हजारोंच्या संख्येने पक्षत्याग होणे अपेक्षित होते. परंतु पक्ष सोडणाऱ्यांमध्ये केवळ पाच जणांची नावे पुढे आली, तीदेखील जम्मू काश्मीरमधून. यावरून आझादांची लोकप्रियता आणि अनुयायांचे बळ दिसते.

**राहुल गांधींमुळे दुरावा**

राहुल गांधी यांनी २०१३ मध्ये पक्षाच्या उपाध्यक्षपदाची सूत्रे घेतली. तेव्हापासून काही ज्येष्ठ नेत्यांना दूर करण्यात आल्याचा आझाद यांचा आरोप आहे. त्यात तथ्यदेखील आहे. राहुल यांनी आपली स्वतंत्र फळी निर्माण केल्याने जुन्या नेत्यांमध्ये दुरावा निर्माण झाला आणि विकोपालाही गेला. त्यातूनच ज्येष्ठ नेत्यांनी पक्षाबाहेर पडण्याची मालिका सुरू झाली. जी-२३ चा उगम राहुल गांधींच्या कृतीत दडला आहे. २०१४ ते २०२२ या काळात दोनवेळा लोकसभेच्या आणि ४९ विधानसभांच्या निवडणुका झाल्या. त्यात केवळ १० विधानसभा वगळता सर्वच निवडणुकांमध्ये लाजीरवाणा पराभव झाल्याचे खापर आझादांकडून राहुल यांच्यावर फोडले जात आहे. परंतु या सर्व निवडणुकांमध्ये आझाद यांचे किती योगदान होते? त्यापैकी त्यांनी किती राज्यांची जबाबदारी स्वीकारली होती? किती सभा घेतल्या? त्याला कसा प्रतिसाद मिळाला याची गोळाबेरीज नको का व्हायला! राहुल, प्रियांका आणि सोनिया गांधी यांनी सभा घ्याव्यात; देश जिंकावा आणि यांना मनासारखे मंत्रालय द्यावे, अशी आझादांवर टीका होत आहे. मोदी सरकारचा समाचार घेण्यासाठी राहुल ‘भारत जोडो’ यात्रा सुरू करीत आहेत. येत्या ७ सप्टेंबरपासून सुरू होणारी ही दिडशे दिवसांची यात्रा बारा राज्यातून ३५०० किलोमीटरचे अंतर कापणार आहे.

• • •

# गणेशोत्सव ‘न्यू नॉर्मल’ करता येईल?

त्या काळाची गरज म्हणून तेव्हा लोकमान्यांनी सार्वजनिक केलेला गणेशोत्सव आताच्या काळाच्या गरजेनुसार बदलता येईल? कसा? हा विषय शाळेच्या वक्तृत्व स्पर्धेचा विषय तर नाही किंवा या लेखाच्या शीर्षकात काही चूक तर नाही ना असे प्रथमदर्शनी अनेकांना वाटू शकेल. पण ती जागा मुद्दामच रिकामी ठेवली आहे. त्याचे कारण सांगण्यापूर्वी आजकाल सर्व चित्रपटांत सुरुवातीस असते तसे

**कातडीबचाऊ निवेदन**

की या लेखातून कोणाच्याही धार्मिक भावना दुखावण्याचा लेखकाचा हेतू नाही. असे लिहिण्याचे कारण म्हणजे आजकाल कोणत्याही छोट्या-मोठ्या शब्दांमधून अनेकांच्या भावनांच्या बांगड्या कचकन् फुटू शकतात, समाजमनाच्या आरशाला तडे जाऊ शकतात. आपण सगळेच इतके कचकड्यासारखे तकलादू व ठिसूळ झालो आहोत! पण या निवेदनात आणखी भर चार वाक्यांची स्वत:बद्दलची आत्मप्रौढी वाटली तरीही. १९७३ ते १९८३ अशी सुमारे दहा वर्षे माझ्या ऐन उमेदीच्या काळात पुण्यातील ‘त्या वेळच्या’ गणेशोत्सवात मी ऊर फुटेपर्यंत अनंत चतुर्दशीच्या मिरवणुकीत ध्वज बेहोष होऊन नाचविला होता, हाताला घट्टे पडेपर्यंत बेलबाग चौक ते लकडी पूल हे अंतर कंबरेचा ढोल न सोडता ढोल वाजविला होता. अखिल मंडई - श्रीमंत दगडूशेठ निंबाळकर तालीम - दत्त गणपती - हिंदू तरुण मंडळ - खडकीबझारमधील गणेशोत्सव मंडळ - या अशा अनेक गणेश मंडळांच्या अनंत चतुर्दशीच्या मिरवणुकीत दुपारी १२ ते दुसऱ्या दिवशी पहाटेचे ६-७ वाजेपर्यंत काळवेळाचे भान विसरून सेवा व पौरुषवृत्तीने सहभागी झालो होतो. त्यामुळे हा लेख लिहिणारा फुरोगामी.. इ. शेलक्या ‘शिव्यांचा’ धनी होण्याचा पात्रतेचा नाही. तो एक सश्रद्ध पण तरीही डोळस गणेशभक्त होता आणि आहे. असो. गणेशोत्सवाच्या बाबतीत ‘आजचा’ हा शब्द लिहिताना हात धजावत नाहीत कारण सांप्रत काळातील नव्या म्हणीप्रमाणे ‘आजचा’ गणेशोत्सव म्हणजे ‘काय तो मांडव, काय ते खड्डे, काय तो डॉल्बीचा ठणठणाट, ऑल नॉट ओक्के!’ - असाच दुर्दैवाने झाला आहे!

**दरवर्षीचे ‘तेच ते’ दळण**

विंदांच्या ‘तेच ते’ कवितेप्रमाणे दरवर्षी गेली निदान १०-२० वर्षे तरी गणेशोत्सवापूर्वी मंडळांच्या पदाधिकाऱ्यांची बैठक, पोलिसांची मिनतवारी, पोलिसांकडून कार्यकर्त्यांची मिनतवारी, ‘उत्साहावर विरजण घालू नका, हे महाराष्ट्राचे सांस्कृतिक वैभव आहे’ या छापाची गुळमुळीत झालेली तीच ठरावीक वाक्ये, मांडव घालणे - काढणे - वाढविणे याबद्दलच्या रशिया- अमेरिकेपेक्षा जास्त प्रदीर्घ चालणाऱ्या वाटाघाटी, सतत वाढत जाणारी गर्दी, नागरिकांची रस्ते बंद झाल्याने होणारी असह्य हतबलता, काळ्या भिंतींच्या आडून येणारे ‘मुंगळ्याचे’ डसणारे आवाज (मला ज्ञानात भर घालावी लागणार आहे कारण ‘मुंगळा’ गाण्याची जागा नवीन कोणा डसणाऱ्या पक्षी/ जनावराने घेतली का माहिती नाहीये!), ढोल, ताशा, झांजांच्या अनिर्बंध वापरामागची तरुणाईची बेपर्वाई वगैरे वगैरे. हे असे ‘आज’बद्दल लिहायचे म्हटले तर कदाचित स्वतंत्र पुरवणीच काढावी लागेल. ही यादी संपणारी नाही. त्यात गेली दोन वर्षे भर पडलीये. लकडी पुलावर आडवा आलेला मेट्रोचा लोखंडी पूल! अनेक ‘माननीय संकल्पकांचा’ हा लोखंडी पूल व त्यामुळे जमिनीवरून चार पावले वरच चालणारे एसयूव्ही फॉर्च्युनरचे ‘रथ’ आणखीनच वर गेले. आणि तसाच त्यांचा रागाचा पाराही. आयुष्यात काळ्या काचेच्या गाड्यांशिवाय कधीही फिरण्याची शक्यता नसलेले व केवळ ‘सेल्फी’ काढून पुणे मेट्रोची शेखी मिरविणाऱ्या या आमच्याच (नगर) सेवकांना गणेशरथांमुळे मेट्रोच्या काही कोटी रुपयांचा अक्षरशः चुराडा होईल, याची तिळमात्र काळजी नव्हती. त्यांच्या काळजीचे एक कारण होते की अनंत चतुर्दशीच्या त्या दहा तासांत आमच्या रथाचे चाक तर रुतणार नाही ना?! गणेशोत्सवाच्या या ‘आज’चे अत्यंत उद्विग्नता आणणारे असे किळसवाणे स्वरूप आहे. ‘मानाच्या’ गणपतींना विसर्जनाची ठरलेली वेळ पाळता येऊ नये? हजारो पोलिसांना बंदोबस्तासाठी अक्षरशः ताटकळत ठेवताना तुम्हाला काहीच वाटत नाही? ‘मिरवणूक सकाळी ८च्या आत संपवू’ अशी दरवर्षी निर्लज्जपणे घोषणा करत, लक्ष्मी रस्त्याच्या जोडीला कुमठेकर, केळकर व टिळक रस्त्यांची मिरवणुकीसाठी भर पडूनही दुसऱ्या दिवशीचे दुपारचे १२ वाजतात, हे महाराष्ट्राचे सांस्कृतिक भूषण व वैभव का, असा प्रश्न पडत नाही? आणि हे केवळ पुण्यासाठी लागू नाही. मुंबईच्या ‘लालबागचा राजा’ म्हणून गौरविला गेलेल्या या राजाची सुरक्षितता ठेवण्यासाठी पोलीस कमिशनरांपासून ते रस्त्यावरच्या पोलीस हवालदारापर्यंत किती हजार माणसांचा जीव दहा दिवस टांगणीला लागतो, हे समजून घ्यायचे असेल तर सदानंद दाते या ज्येष्ठ पोलीस अधिकाऱ्याचे अनुभवकथन एकदा अवश्य वाचाच.

**‘आजकडून उद्याकडे!’**

व्यवस्थापन क्षेत्रात नेहमीच उदाहरण दिले जाते की ‘आजची’ छोटी रेघ त्रासदायक वाटत असेल तर तिला पुसण्याचा प्रयत्न करून व्यर्थ वेळ, पैसा, शक्ती वाया घालवू नका. छोट्या रेषेशेजारी दोन-तीन मोठ्या रेघा चित्रित करा, आपोआप डोळ्यांना खुपणारी ‘छोटी’ रेघ नजरेआड होईल. काहीशा याच विचाराने लेखाच्या उरलेल्या भागात अशा काही मोठ्या रेघा सुचवितो आहे. अनेकांच्या स्वप्नरंजनातून, भन्नाट कल्पनांमधून - आजच्या भाषेत ज्याला ग्राउंड सोर्सिंग ऑफ आयडियाज अशा नवीन रेषांचे सुंदर चित्र तयार होऊन उद्याचा गणेशोत्सव आणखी देखणा, मनोवेधक व खरोखरच सुखवर्धक व दु:खनिवारक होऊ शकेल. कोणत्या या मोठ्या रेघा?



सार्वजनिक ते कौटुंबिक असा नवा प्रवास लोकमान्य टिळकांनी स्वातंत्र्यपूर्व काळात गणेशोत्सव व शिवजयंती हे दोन उत्सव समाजमान्य केले. व्यक्तिगत उपासनेला सामाजिक आराधनेची मान्यता दिली. आज हा प्रवास नव्याने ‘सार्वजनिक ते कुटुंबाकडे’ असे करण्याची नक्की आवश्यकता आहे. माझ्या श्रद्धा, धर्म, विश्वास, जात, राज्य, भाषा, लिंग या सर्व ओळखी माझ्या घराच्या आतमध्ये मी ठेवीन व घराबाहेर वावरताना, समाजात ऊठबस करताना माझी एकमेव व पहिली ओळख ‘भारतीय नागरिक’ अशीच असेल असे करावे लागेल. घराबाहेर जाताना गंधाचे टिळे, ‘गर्वसे कहो..’, जीझस द ओन्ली सेव्हियर, चांदण्या लावलेले स्टिकर्स यांसारखी कोणतीच चिन्हे मी अभिमानाने वागविण्याचे कारण नाही. या माझ्या श्रद्धा आत्यंतिक प्रामाणिक असल्या तरी मी त्यांचे घरात आचरण करीन. त्यांचे घराबाहेर याचे प्रकटीकरण, साजरेकरण, उदात्तीकरण काहीही करणार नाही. असे करता येईल का? अवघड आहे, पण अशक्य नाही. अवघड आहे कारण या गोष्टींची बरीच वर्षे सवय झाली आहे. त्या सवयीच्या गुलामीतून बाहेर यायला स्वातंत्र्याच्या ७५ व्या वर्षी संकल्प करून प्रयत्न करता येतील.

‘स्मॉल इज ब्युटीफूल’ असे सांगणारा शूमेकरसारखा या गेल्या शतकातील तत्त्वज्ञ पुन्हा आठवायला लागेल. छोटी गणेशमूर्ती, कर्कश ढोलताशांऐवजी लहान आवाजाचा एखादाच टाळ - मृदुंग, चकाकणाऱ्या वीज खाणाऱ्या रोषणाईऐवजी समईत शांत प्रकाश देणारी एखादी ऊर्जा, गर्दीचे महापूर रस्त्यांवर वाहण्याऐवजी आपण राहतो ती गल्ली, छोटी वस्ती, २५-५० परिचित कुटुंबे, आसपासचेच परिघातले नागरिक अशा लाखो-कोट्यवधी ‘छोट्या’ पूजांचे आयोजन व त्यातून नटलेले व खड्डे - खांब यांच्या जंजाळातून मोकळे झालेले गणपती बाप्पा, आणि त्यांच्या आजूबाजूला एकमेकांशी हितगुज करणारे सर्व जाती - धर्म - लिंग - वयोगटांचे नागरिकांचे छोटे छोटे पण जिवंत समूह. असे सगळे ‘उद्या’च्या गणेशोत्सवाचे न्यू नॉर्मल करता येईल का? यंदापासून त्याला सुरुवात करूयात का?

# भारताने पाकिस्तानला लोळवले!



## आशिया चषक: पंड्याची अष्टपैलू कामगिरी

हार्दिक पंड्याची अष्टपैलू कामगिरी आणि गोलंदाजीत भुवनेश्वर कुमार, तर फलंदाजीत रविंद्र जडेजाची मिळालेली साथ या जोरावर भारताने आशिया चषक स्पर्धेच्या पहिल्याच सामन्यात रविवारी पाकिस्तानला पराभवाचे पाणी पाजले. हा हायव्होल्टेज सामना शेवटपर्यंत रंगतदार झाला. हार्दिक पंड्याने अनुभवाचा चपखल वापर करत भारताला विजयी सुरुवात करून दिली.

प्रत्युत्तरार्थ फलंदाजीला आलेल्या भारताची सुरुवात अडखळत झाली. डावाच्या दुसऱ्याच चेंडूने बॅटची कड घेत लोकेश राहुलचा त्रिफळा उडवला. त्यानंतर रोहित शर्मा आणि विराट कोहली या आजी-माजी कर्णधारांनी भारताचा डाव सावरण्याचा प्रयत्न केला. एक मोठा फटका मारण्याच्या प्रयत्नात रोहितने विकेट सोडली. भारताची धावसंख्या ५० असताना रोहितच्या रुपाने पाकला दुसरी विकेट मिळाली. त्यापाठोपाठ विराटचाही संयम सुटला. कोहलीने ३५ धावा ठोकल्या. लॉन्गऑनच्या वरून चेंडू टोलावण्याच्या प्रयत्नात विराट कोहलीने आपली विकेट गमावली. दोन बळी लागोपाठ मिळाल्याने पाकिस्तानने मॅचमध्ये पुनरागमन केले. त्यानंतर रविंद्र जडेजा आणि सूर्यकुमार यादव ही जोडी बऱ्यापैकी सेट झाली. ही जोडी भारताला विजय मिळवून देणार असे वाटत होते; पण तितक्यात सूर्यकुमारचे नियंत्रण सुटले आणि भारताला आणखी एक धक्का बसला. त्यानंतर रविंद्र जडेजा आणि हार्दिक पंड्या या जोडीने अनुभव पणाला लावत भारताचा विजय सोपा केला. पंड्याने १९व्या षटकात तीन चौकार लगावत विजय आवाक्यात आणला. शेवटच्या षटकात ७ धावांची आवश्यकता असताना पहिल्याच चेंडूवर मोठा फटका लगावण्याच्या प्रयत्नात जडेजा त्रिफळाचीत झाला. त्यानंतर पंड्याने षटकार लगावत भारताच्या विजयावर शिक्कामोर्तब झाले. भारताने विसाव्या षटकाच्या चौथ्या चेंडूवर विजयी लक्ष्य गाठले. पंड्याने १७ चेंडूंत नाबाद ३३ धावा जमवल्या.

नाणेफेकीचा कौल जिंकून भारताने पाकिस्तानला प्रथम फलंदाजीला पाचारण केले. भुवनेश्वरने डावाच्या पहिल्याच चेंडूपासून पाकच्या फलंदाजांवर दबाव टाकायला सुरुवात केली. तिसऱ्या षटकात कर्णधार बाबर आझमला शॉर्ट पीच चेंडूवर फसवत भुवनेश्वरने भारताला पहिला बळी मिळवून दिला. आवशे खानने सहाव्या षटकात फकर झमनचा अडथळा दूर केला. भुवनेश्वर कुमारने ४, तर हार्दिक पंड्याने ३ बळी मिळवून पाकिस्तानच्या गोलंदाजांना दबावात ठेवले. अर्शदीप सिंगने २ आणि आवेश खानने १ विकेट मिळवले. गोलंदाजांच्या दमदार कामगिरीच्या जोरावर पाकिस्तानला मोठी धावसंख्या करण्यापासून रोखण्यात भारताला यश आले. १९.५ षटकांत पाकिस्तानचा संघ १४७ धावांवर आटोपला. सलामीवीर मोहम्मद रिझवानने संघातर्फे सर्वाधिक ४३ धावा केल्या. इफ्तिकार अहमदने २८ धावांचे योगदान दिले. तळात शहानवाज दहानीने दोन षटकार लगावत ६ चेंडूंत १६ धावा करत पाकिस्तानच्या धावफलकात भर घातली. पाकिस्तानचे अन्य फलंदाज धावा जमविण्यात अपयशी ठरले.

मिरा भाईंदर महानगरपालिका
ULB code - 802786
स्वच्छ सर्वेक्षण 2023

गणपती विसर्जनाकरीता स्विकृती केंद्र खालीलप्रमाणे



प्रभाग समिती कार्यालय 1
1 मॅक्सेस मॉल
2 भाईंदर सेकंडरी स्कुल

प्रभाग समिती कार्यालय 2
3 सदानंद हॉटेल स्टेशन रोड
4 शिवसेना गल्ली स्टेशन रोड
5 जैन मंदिर रोड 60 फुट रोड

प्रभाग समिती कार्यालय 3
6 केबिन रोड रेल्वे लाईनवरील फुट ओव्हरब्रिज खाली
7 बी.पी रोड प्रशांत हॉटेल जवळ
8 गोडदेव नाका भारत बँक
9 नवघर रोड कस्तुरी पार्क फादर जोसेफ स्कुल मेन रोड
10 नवघर नाका हनुमान मंदिर समोर

प्रभाग समिती कार्यालय 4
11 गोल्डन नेस्ट डावी बाजू पोलिस चौकी
12 इंद्रलोक फेज-3 ओम शांती चौक
13 सेव्हन इलेव्हन शाळा चौक दिपक हॉस्पीटल लेन
14 मा.स्व.मिनाताई ठाकरे मैदान
15 जे.पी. इन्फ्रा घोडबंदर
16 गौरव सिटी चौक हटकेश
17 महानगरपालिकेचे वाहनतळ एम. आय. जी. कॉम्पलेक्स समोर
18 स्टार मार्केट कनकिया रोड

प्रभाग समिती कार्यालय 5
19 शरयु माता चौक अग्रवाल स्वीट समोर
20 शांतीनगर सेक्टर 04 मैदान

प्रभाग समिती कार्यालय 6
21 पोलिय आयुक्त कार्यालय, रामनगर शांती गार्डन
22 डॉन बॉस्को इंग्लिश स्कुल प्लेझंट पार्क
23 हॉली क्रॉस स्कुल शितल नगर
24 सिल्वर पार्क अग्निशमन केंद्र

गणपती विसर्जनाकरिता कृत्रिम तलाव
1 शिवार गार्डन, मिरा रोड (पुर्व)
2 सुभाषचंद्र बोस मैदान, भाईंदर (प.)
3 जॉगर्स पार्क, मिरा रोड (पु.)

श्री. दिलीप ढोले, आयुक्त तथा प्रशासक

MBMCOnline @BhaindarMira @mbmconline | Mira Bhainder Municipal Corporation

# सावधान वीजबिलांआडून सायबर फसवणूक

## बनावट मेसेज पाठवून ग्राहकांची होत आहे फसवणूक



विज बिल भरण्यासाठी मेसेज आला असेल तर सावधान, वीज बिल थकलं असेल तर वीजबिल धारकांनी होणाऱ्या फसवणुकी पासून आधीच सावध झाले पाहिजे कारण सायबर ठगांकडून होऊ शकते फसवणूक, चुकूनही 'हे' करू नका,आज जितके वेगवान डिजिटल जगाकडे वाटचाल करीत आहोत, सायबर गुन्ह्यांची संख्याही जलद वाढत आहे. तंत्रज्ञान ज्या वेगात प्रगती करत आहे त्याच वेगाने इंटरनेटवर माणसाची अवलंबित्वही वाढली आहे. एकाच ठिकाणी बसून इंटरनेटद्वारे मानवांचा प्रवेश जगातील प्रत्येक कोप रयात सोपा झाला आहे. आजच्या काळात, एखादी व्यक्ती ज्या गोष्टीबद्दल विचार करू शकते, ती इंटरनेटद्वारे प्रवेश केली जाऊ शकते, जसे सोशल नेटवर्किंग, ऑनलाइन शॉपिंग, डेटा संग्रहित करणे, गेमिंग, ऑनलाइन अभ्यास, ऑनलाइन नोकरी इ. आज इंटरनेट जवळजवळ प्रत्येक क्षेत्रात वापरली जाते. इंटरनेटच्या विकासासह आणि त्याच्याशी संबंधित फायद्यांबरोबरच सायबर गुन्ह्यांची संकल्पनाही विकसित झाली आहे. सध्या भारतातील बरीच लोक सोशल नेटवर्किंग साइट वापरतात. भारतात सोशल नेटवर्किंग साइट्सच्या वापराविषयी माहितीचा अभाव आहे. यासह, बहुतेक सोशल नेटवर्किंग साइटचे सर्व्हर परदेशात आहेत, ज्यामुळे भारतात सायबर गुन्हेगारीच्या मुळावर जाणे कठीण होते. सायबर क्राइममध्ये खंडणी, ओळख चोरी, क्रेडिट कार्डची फसवणूक, संगणकावरील वैयक्तिक डेटा हॅक करणे, फिशिंग, बेकायदा डाउनलोड करणे, सायबर साठवण, व्हायरस प्रसार यासह विविध प्रकारच्या उपक्रमांचा समावेश आहे.महाराष्ट्रातील वीजग्राहकांना वैयक्तिक क्रमांकावरून बनावट 'एसएमएस' (SMS) पाठवून वैयक्तिक मोबाईल क्रमांकावर संपर्क साधायला सांगणे. त्यानंतर एखादी लिंक पाठवून किंवा सॉफ्टवेअर डाऊनलोड करण्यास सांगणे आणि या प्रकारे वीजग्राहकाने प्रतिसाद दिल्यास आर्थिक फसवणूक करण्याचे प्रकार घडत आहेत. त्यामुळे कोणत्याही परिस्थितीत वैयक्तिक मोबाईल क्रमांकावरून आलेल्या बनावट एसएमएसला कोणताही प्रतिसाद देऊ नये,

### ग्राहकांची आर्थिक फसवणूक कशी होते?

मागील काही दिवसांपासून विविध ग्राहकांना बनावट एसएमएस पाठवून लुबाडण्याचे प्रकार घडत आहे. नुकतेच काही शहरात बनावट SMS पाठवून ऑनलाईनद्वारे लुबाडल्याचा प्रकार घडत आहे. यासोबतच महावितरणने देखील बनावट SMS प्रकरणी सायबर सेलमध्ये याआधी तक्रारी दाखल केल्या आहेत. मागील महिन्याचे वीजबिल अपडेट नसल्याच्या कारणावरून वीजपुरवठा खंडित करण्यात येणार आहे, त्यामुळे सोबत दिलेल्या वैयक्तिक मोबाईल क्रमांकावर संपर्क साधावा, असे बनावट SMS नागरिकांना पाठविण्यात येत आहेत.




### लाईट बिल भरणे /विज बिल भरणे संभंधित फेक मेसेजेस

तुम्हाला अनोळखी नंबर वरून एक मेसेज येईल किंवा फोन येईल की तुमचे लाईट बिल भरले गेलेले नाही. जरी तुम्ही लाईट बिल भरले गेले असले तरी तुम्हाला वेगवेगळे कारण सांगतील जसे की सिस्टीम मध्ये अपडेट झालेला नाही किंवा सर्वर डाऊन असल्यामुळे तुमचे लाईट बिल भरले गेले नाही. तुम्ही जर लाईट बिल भरले नाही तर तुमचे वीज कनेक्शन बंद करण्यात येईल अशा प्रकारचे मेसेज किंवा फोन करून तुम्हाला घाबरवलं जाईल. किंवा लाईट बिल भरा अन्यथा कनेक्शन बंद होईल /वीज बंद केली जाईल, अशा प्रकारचे मेसेज किंवा फोनद्वारे विश्वास संपादन करतात त्यामुळे लोकांचा विश्वास बसतो व लोकांना विज बिल भरण्यासाठी खालील प्रक्रिया करण्यासाठी सांगतात.

1. महावितरण किंवा संबंधित वीज वितरण कंपनीचा लोगो असलेले ॲप डाऊनलोड करायला सांगतात.
2. त्याचबरोबर Any desk ,Quick support, Teamviwer सारखे थर्ड पार्टी रिमोट एक्ससे ॲप डाऊनलोड करायला सांगतात.
3. सदर ॲप्स माध्यमातून अनोळखी लिंक पाठवून विज बिल भरण्यास सांगतात.
4. सुरुवातीला लाईट बिल सारखे भासवणारे कमी पैशाचे व्यवहार करण्यास सांगतात.
5. नंतर थर्ड पार्टी ॲप डाउनलोड केल्यामुळे बँक खात्यातील संपूर्ण रक्कम गायब होते.
6. सर्वात शेवटी थर्ड पार्टी ॲप डिलीट करण्यास सांगतात त्यामुळे पैसे डीडक्ट झालेला मेसेज ही आपल्याजवळ पुरावा म्हणून राहत नाही.

अशाप्रकारे लाईट बिल भरण्याचा नावाखाली लोकांना विश्वासात घेऊन फसवणूक होण्याचे प्रकार सध्या खूप प्रमाणात वाढत आहेत .यावर खबरदारीचा उपाय म्हणून लोकांनी खालील प्रकारे काळजी घ्यावी*.

1. कोणताही अनोळखी फोन कॉल किंवा मेसेजला प्रतिसाद देऊ नका( मग तो बँकेद्वारा असो इतर सरकारी कंपन्या द्वारे असो किंवा महावितरण किंवा लाईट बिल मंडळातर्फे असो)
2. कोणतेही थर्ड पार्टी ॲप जसे की Any Desk, Quick Support, TeamViewer सारखे ॲप डाऊनलोड करू नका व अनोळखी लिंक वर क्लिक करू नका.
3. कोणालाही ओटीपी शेअर करू नका व स्वतःच्या बँकेची व गोपनीय माहिती शेअर करू नका.
4. कोणतेही बिल भरणा करताना अधिकृत साईड वरूनच जाऊन किंवा प्रत्यक्ष कार्यालयात भेट देऊनच व्यवहार करावा.

वरील प्रकार सारख्या कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नका किंवा मेसेज किंवा फोन ला प्रतिसाद देऊ नका.अधिक माहितीसाठी जवळच्या पोलीस स्टेशन ला संपर्क साधा.

महावितरणकडून केवळ मोबाईल क्रमांकाची नोंदणी केलेल्या वीजग्राहकांनाच सिस्टीमद्वारे S M S पाठविण्यात येतात आणि त्याचा सेंडर आयडी (Sender ID) हा 'एमएसईडीसीएल' (MSEDCL) (उदा. VM-MSEDCL, VK-MSEDCL) असा आहे. तसेच या अधिकृत मेसेजमधून वीजग्राहकांना किंवा नागरिकांना महावितरणच्या कोणत्याही अधिकाऱ्याच्या वैयक्तिक मोबाईल क्रमांकावर संपर्क करण्याबाबत कळविले जात नाही. 'वीजबिलाची रक्कम भरलेली नसल्याने वीजपुरवठा आज रात्री खंडित करण्यात येत आहे' असा संदेश वेगवेगळ्या वैयक्तिक मोबाईल क्रमांकावरून पाठविण्यात येत असल्याचे पुन्हा प्रकार घडत आहेत. या मेसेजनंतर वीजबिल भरण्यासाठी वैयक्तिक मोबाईल क्रमांकावरून ऑनलाईन पेमेंटसाठी बनावट लिंक पाठविण्यात येत आहे. तसेच ग्राहकांना वीजबिल भरण्यासाठी सॉफ्टवेअर डाऊनलोड करण्यास सांगितले जात आहे. ग्राहकांनी त्यास प्रतिसाद दिल्यास मोबाईल किंवा संगणक हॅक करून बँक खात्यातील शिल्लक रक्कम लंपास करण्याची मोठी शक्यता आहे. त्यामुळे वीजग्राहकांनी या बनावट मेसेज व लिंककडे संपूर्णपणे दुर्लक्ष करावे.

### काय करावे जर आपणासोबत वरील प्रमाणे प्रकार घडल्यास?

काही शंका व तक्रारी असल्यास वीजग्राहकांनी चोवीस तास सुरु असलेल्या १९१२, १८००१०२३४३५ किंवा १८००२३३३४३५ या टोल फ्री क्रमांक किंवा नजीकच्या कार्यालयांशी संपर्क साधावा. तसेच अशाप्रकारे संदेश आल्यास ग्राहकांनी cybercrime.gov.in या पोर्टलवर तक्रारीची नोंद करावी, असेही आवाहन महावितरणने केले आहे तुमच्या सोबत असे काही घडले असेल तर एफ आय आर द्या, सायबर सेल ला रिपोर्ट द्या,

फ्रॉड्स चे स्वरूप प्रत्येक वेळी नवीन असेल. तेंव्हा काळजी घ्या सावध राहा...

साइबर कंसलटेंसी साठी किंवा काही सायबर फ्रौड झाल्यास एडवोकेट अंकिता रा जयसवाल (सायबर कन्सल्टंट) फेसबुक पेज लीगल अवेयरनेस टॉक बाय एडवोकेट अंकिता आर जयसवाल ला भेट द्या, आनी nyaykagyan.blogspot.com ला विजिट दया,.

# भिवंडीत सामूहिक बलात्कार; अल्पवयीन मुलीवर तीन जणांकडून अत्याचार



भिवंडी : 16 वर्षाच्या अल्पवयीन मुलीवर सामूहिक लैंगिक अत्याचाराची धक्कादायक घटना भिवंडी तालुक्यातील काल्हेर गावातील एका सोसायटीत गावात घडली आहे. अल्पवयीन मैत्रिणीचे एका इमारतीतील बेडरूममध्ये हातपाय बांधून तिच्यावर जबरदस्ती करुन आळीपाळीने बलात्कार केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या प्रकरणी तिघानराधमाविरोधात नारपोली पोलीस ठाण्यात अत्याचारासह पोक्सो कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल करून पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. आकाश कनोजिया (22), साहिल मिश्रा (21), सचिन कांबळे (35) अशी बेड्या ठोकलेल्या तिघा नराधमांची नावे आहेत. पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, पीडित 16 वर्षीय तरुणी ठाण्यातील वर्तकनगर भागात कुटुंबासह राहत असून ती एका महाविद्यालयात शिक्षण घेत आहे. याच दरम्यान मुख्य आरोपी आकाशशी तिचे मैत्रीचे संबंध होते. मुख्य आरोपी आकाश हा ठाण्यातील मेंटल हॉस्पिटल भागात राहणार आहे. तर त्याचे दोन मित्र आरोपी सचिन आणि साहिल वागळे इस्टेट भागात राहतात. 26 ऑगस्ट रोजी शनिवारी दुपारच्या सुमारास नराधम मुख्य आरोपीने पीडितेला चितळसर ठाणे येथून भिवंडीतील काल्हेर येथील एका सोसायटीच्या बिल्डिंगमधील रूमवर आणले. त्यानंतर तिघांनी बेडरूममध्येच पीडितेचे हात बांधून तिच्यावर जबरदस्तीने आळीपाळीने बलात्कार केला. शिवाय तिने प्रतिकार केला असता तिला बुक्क्यांनी मारहाण करून तिच्या गुप्तांगाला चावा घेऊन जखमी केले. या घटनेनंतर भयभीत झालेल्या पीडित तरूणीने घरी जाऊन तिच्यासोबत घडलेल्या प्रसंगाचे कथन करताच नातेवाईकांना धक्काच बसला. नातेवाईकांनी तिला 28 ऑगस्ट रोजी प्रथम ठाण्यातील चितळसर मानपाडा पोलीस ठाणे गाठून घडलेला प्रकार कथन केल्याने पोलिसांनी तिघांवर गुन्हा दाखल केला. मात्र गुन्हा भिवंडीतील नारपोली पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडल्याने हा भिवंडीत वर्ग करण्यात आला आहे. याप्रकरणी नारपोली पोलिसांनी भादवि कलम 376 (ड), 323, 506 पोक्सो कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल करून आज तिघांना भिवंडीतील काल्हेर गावातील एका सोसायटीमधून ताब्यात घेऊन बेड्या ठोकल्या आहेत.

आज सायंकाळच्या सुमारास मुख्य आरोपी आकाश याला घटनास्थळी नेऊन पुरावे गोळा करण्याचे काम पोलिसांनी सुरु केले आहे. त्यानंतर तिघांची शासकीय रुग्णालयात तपासणी करून पोलीस कोठडीत डांबले आहे. या तिन्ही नराधमांना उद्या न्यायालयात हजर करण्यात येणार असल्याची माहिती तपास अधिकाऱ्यांनी दिली आहे. अधिक तपास नारपोली पोलीस करत आहेत.

# बांधकाम व्यावसायिकाचे अपहरण करुन खून करणाऱ्या तिघांना सांगली पोलिसांकडून अटक



सांगली प्रसिद्ध बांधकाम व्यवसायिकाचा खुनाचा छडा सांगली पोलिसांनी लावला आहे. या प्रकरणी तिघांना अटक करण्यात आली आहे. पैसे उकळण्यासाठी अपहरण करण्यात आले. या दरम्यान झालेल्या मारहाणीत बेशुद्ध झालेल्या माणिकराव पाटील यांना मृत समजून जिवंतच वारणा नदीमध्ये नदीपात्रात फेकण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार समोर उघडकीस आला आहे.या प्रकरणी तिघांना अटक सांगली शहरातील प्रसिद्ध बांधकाम व्यवसाय माणिकराव पाटील यांचा 13 ऑगस्ट 2022 रोजी मिरज तालुक्यातल्या तुंग येथून अपहरण करण्यात आले होते.जमीन दाखवण्याच्या पाहण्याने त्यांना बोलवण्यात आल्या त्यानंतर त्यांचा अपहरण करत खून करण्यात आल्याचा प्रकार समोर आला होता. त्यानंतर माणिकराव पाटील यांचा मृतदेह कवठेपिरान येथील वाण्या नदीपात्रामध्ये आढळून आला होता. बांधकाम व्यवसायिक असणाऱ्या माणिकराव पाटील यांचा अपहरण कोणी आणि कोणत्या कारणातून केले आणि खून कसा केला ? याचा छडा लावणे पोलिसांच्या समोर मोठे आव्हान बनले होते. मात्र स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा आणि सांगली ग्रामीण पोलिसांनी तपास करत खूनाचा छडा लावला आहे. या प्रकरणी तिघांना अटक करण्यात आली आहे. किरण रणदिवे,वय 26,अनिकेत ऊर्फ निलेश दुधारकर ,वय 22 आणि अभिजित चंद्रकांत कणसे ,वय 20 सर्व राहणार कारंदवाडी,तालुका वाळवा,असे नावे आहेत.

# आधी देवाचे पाया पडले, त्यानंतर दानपेटीचा गल्ला फोडला; चोरटे सीसीटीव्हीत कैद

नांदेडच्या हिमायतनगर तालुक्यातील सिरंजनी येथील हनुमान मंदिरात चोरीची घटना समोर आली आहे. विशेष म्हणजे चोरी करण्यासाठी आलेल्या चोरट्यांनी आधी देवाचे पाय पडले त्यानंतर दानपेटी फोडून त्यातील रोख रक्कम आणि सोने-चांदी घेऊन पसार झाले आहे. याप्रकरणी पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. स्थानिकांनी दिलेल्या माहितीनुसार, हिमायतनगर तालुक्यातील सिरंजनी येथे हनुमान मंदिर आहे. गावकऱ्यांचे श्रद्धा स्थान असल्याने याठिकाणी नेहमी गावकऱ्यांची गर्दी असते. मात्र रात्रीच्या वेळी कुणीही राहत नसल्याने मंदिराच्या गेटला कुलूप लावण्यात येते. दरम्यान शनिवारी रात्रीच्या सुमारास दोन चोरट्यांनी मंदिरात प्रवेश करत चोरी केली आहे. सकाळी गावकरी दर्शनासाठी मंदिरात गेल्यावर या घटनेचा खुलासा झाला. चोरी करण्यापूर्वी देवाचे पाया पडले...

मंदिरात लावण्यात आलेल्या सीसीटीव्हीमध्ये दोन्ही चोर कैद झाले आहेत. यावेळी काळे कपडे घालून आलेल्या दोन चोरट्यांनी गेटचा कुलूप तोडून आधी मंदिरात प्रवेश केला. आता आल्यावर मंदिरातील हनुमानाच्या समोर डोके टेकून दोघेही पाया पडले. त्यानंतर समोरच असणाऱ्या दानपेटीचे कुलूप तोडत, उत्सव कालावधीत भाविकांनी टाकलेलं अर्धाकिलो सोने, चांदी व नगद रोकड असा सर्व ऐवज लंपास केला. चोरी करतांना दोन्ही चोर सीसीटीव्हीत कैद झाले आहेत.

# पतीनं मोबाईल अनलॉक करुन न दिल्यामुळे रुसलेल्या पत्नीनं संपवलं जीवन

सांगलीतील धक्कादायक घटनेनं संपूर्ण जिल्हा हादरला आहे. पतीनं मोबाईलचं लॉक काढून दिलं नाही, म्हणून पत्नी नाराज झाली आणि तिनं टोकाचं पाऊल उचललं. नाराज पत्नीनं गळफास घेत आत्महत्या केली आहे. सांगली जिल्ह्यातील वाळवा तालुक्यात ही घटना घडली. सांगली जिल्ह्यात वाळवा तालुक्यातील शिरटे येथील भगवान खोट हे आपली पत्नी आणि दोन मुलांसह राहत होते. शेतजमीन कमी असल्यानं ते सारख कारखान्यात नोकरी करत होते. शेतीतून येणारं थोडंथोडकं उत्पन्न आणि साखर कारखान्यातील नोकरी यावर आपल्या कुटुंबाचा कसाबसा उदरनिर्वाह चालवत होते. काल सकाळी भगवान यांचा मोबाईल पत्नी मनीषा यांनी घेतला. भगवानकडे मनिषानं मोबाईलचा लॉक काढून द्या, असा हट्ट धरला. पण भगवाननं पत्नीच्या हट्टाकडे दुर्लक्ष केलं. पतीने त्यांच्या मोबाईलचं लॉक काढून दिलं नाही म्हणून नाराज होत पत्नीनं घराच्या तुळईला गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. सांगली जिल्ह्यातील वाळवा तालुक्यातील शिरटे येथे घडली आहे. मनीषा भगवान खोत (वय 38) असं मृत महिलेचं नाव आहे. याप्रकरणी इस्लामपूर पोलीस ठाण्यात शिवाजी निवृती खोत यांनी फिर्याद दिली आहे.




# आयपीएस अधिकाऱ्यानंतर हॅकर्सकडून फसवणुकीसाठी राजकीय नेत्यांच्या फोटोचा वापर



आयपीएस अधिकाऱ्याचं नाव आणि फोटोंचा आधार घेत व्हॉट्सॲपचा वापर करुन पोलीस कर्मचाऱ्यांची आर्थिक फसवणूक (Fraud Case) होत असल्याचे समोर आल्यानंतर आता राजकीय नेत्यांच्या फोटोचा वापर करून फसवणूक होत असल्याचा प्रकार समोर आला आहे. शिवसेना नेते आदित्य ठाकरे (Aaditya Thackeray) यांचा फोटो वापर करत वरळीतील एका क्रीडापटूची फसवणूक करण्याचा प्रयत्न झाल्याचे समोर आले आहे. याबाबत वरळी कोळीवाड्यातील रहिवासी दिपेश जांभळे यांनी याबाबत पोलिसांकडे तक्रार केली आहे. दिपेश जांभळे हे कुस्तीपटू आहेत. त्यांना 23 ऑगस्ट रोजी एक व्हॉट्स ॲपवर मेसेज आला. व्हॉट्स ॲपवर मेसेज करणाऱ्या व्यक्तीने प्रोफाइल फोटो म्हणून शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे आणि आदित्य ठाकरे यांचा फोटो ठेवला होता. या आरोपीने तक्रारदार कुस्तीपटू दिपेश जांभळे यांना मेसेज पाठवून पैशांची मागणी केली. आपल्याला एका मित्राला तातडीने 25 हजार रुपये ट्रान्सफर करायचे असून नेटबँकिंग काम करत नसल्याचे म्हटले. त्यामुळे तातडीने 25 हजार रुपये पाठवण्याची विनंती हॅकर्स आदित्य ठाकरे असल्याचे भासवून केली. दिपेश यांना संशय आल्याने त्यांनी तातडीने युवासेनेच्या पदाधिकाऱ्यांना याची माहिती दिली. त्यानंतर पोलिसांमध्ये याची तक्रार देण्यात आली. दादर पोलिसांनी या प्रकरणी भारतीय दंड संहितेच्या कलम 511 आणि 419 नुसार, माहिती तंत्रज्ञान कायद्याच्या कलमांखाली गुन्हा दाखल केला आहे. पोलीस या प्रकरणी अधिक तपास करत आहेत.

### आयपीएस अधिकाऱ्यांच्या नावाने फसवणूक

मीरा भाईंदरचे पोलीस आयुक्त सदानंद दाते यांचा फोटो आणि नाव वापरुन कोणीतरी व्हॉट्सॲप चालवत असल्याचं पोलीस सूत्रांनी सांगितलं. या व्यक्तीने अनेक पोलिसांना मेसेज करुन ॲमेझॉन गिफ्ट कार्ड खरेदी करुन पाठवण्यास सांगितले. ही बाब दाते यांना समजताच त्यांनी अज्ञात सायबर गुन्हेगाराविरुद्ध गुन्हा दाखल केला आणि महाराष्ट्र सायबर सेलला तपास करण्यास सांगितले आहे. महाराष्ट्र सायबर सेलचे पोलीस अधीक्षक संजय शिंत्रे यांनी एबीपी न्यूजशी बोलताना सांगितलं की, "आम्हाला तक्रार मिळाली असून आम्ही या प्रकरणाचा तपास करत आहोत. हा आरोपी पोलीस, रेल्वे किंवा इतर कोणत्याही शासकीय विभागात काम करणाऱ्या कनिष्ठ दर्जाच्या कर्मचाऱ्यांची फसवणूक करतो. हा सायबर गुन्हेगार वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्याचा फोटो, बनावट मोबाईल नंबर वापरुन व्हॉट्सॲप चालवत आहेत आणि ते त्या नंबरचा वापर करुन त्या विभागातील सर्वात कनिष्ठ लोकांना ॲमेझॉन गिफ्ट कार्ड खरेदी करण्यासाठी आणि त्यांना त्वरित पाठवण्यासाठी मेसेज पाठवत आहेत," असं संजय शिंत्रे यांनी सांगितलं.

# औरंगाबादमध्ये तब्बल 62 लाखांचा विदेशी दारूसाठा पकडला, राज्य उत्पादन शुल्क विभागाची कारवाई



औरंगाबादमध्ये राज्य उत्पादन शुल्क विभागाने मोठी कारवाई केली आहे. शुल्क विभागाने केलेल्या कारवाईत तब्बल विदेशी मद्याचा लपवून ठेवलेला एकूण 62 लाख 14 हजार रुपये किमतीचा मद्यसाठा जप्त करण्यात आला आहे. याप्रकरणी तिघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. एवढ्या मोठ्याप्रमाणावर विदेशी दारूसाठ्यावर कारवाई करण्यात आल्याने मोठी खळबळ उडाली आहे. तर याप्रकरणी प्रकाश काकासाहेब साबळे (वय 27 वर्ष) आणि रौनक अंकुश मुळे (वय 23 वर्ष दोघेही रा. इसारवाडी, ता. पैठण जि. औरंगाबाद) यांच्यासह वाहनचालक विकास काकासाहेब साबळे (वय 24 वर्ष रा. इसारवाडी ता. पैठण जि. औरंगाबाद) यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस बातमी पत्र
ALL SCAN & PAY ACCEPTED HERE
PhonePe G Pay Pay

हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं. 4, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीय इस्टेटच्या बाजूला, गेट नं. 2, गोरेगांव (पूर्व), मुंबई - 400 063 येथे छापून 2, राजाराम को. ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर (पूर्व), ठाणे - 401 105 येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत ).संपर्क:-9594418181 / 8424989898